# शेतकऱ्याला आर्थिक स्थैर्य देणाऱ्या धोरणाची अंमलबजावणी आवश्यक

## माजी खा. राजू शेट्टी; 'अंदाजपत्रक अपेक्षा व आव्हाने' विषयावरील कार्यशाळेचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कृषी क्षेत्रातील गुंतवणूक कमी होत चालली आहे. अर्थव्यवस्थेला गती देणारा शेतकरी आत्महत्या करत आहे. त्यामुळे देशात मंदीची लाट आली आहे. यातून सावरण्यासाठी गावपातळीवरील शेतकऱ्याला आर्थिक स्थैर्य देणारे धोरण तयार करून त्याची अंमबजावणी करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन माजी खा. व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र विभाग व बँक ऑफ इंडिया अध्यासनाच्या वतीने आयोजित 'अंदाजपत्रक अपेक्षा व आव्हाने' या विषयावर आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे.एफ.पाटील होते.

शेती हा उद्योग नाही ती देशाची संस्कृती आहे, असे सांगून शेट्टी म्हणाले, नफ्याचा विचार न करता आपल्या संस्कृतीचे पालन करण्याचे



**कोल्हापूर : 'अंदाजपत्रक अपेक्षा व आव्हाने' या चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात बोलताना माजी खा. राजू शेट्टी. शेजारी डॉ. एम. एस. देशमुख, प्रा. विजय ककडे, डॉ. जे. एफ. पाटील, बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक नितीन देशपांडे, सुरेंद्र जैन, संजय शेटे आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

काम शेतकरी करत आहे. यातून शेतकरी अन्न, वस्त्र व निवारा देतो; पण त्या शेतकऱ्याला काय मिळते. सरकारी धोरणाच्या ओझ्याखाली आज शेतकरी दबला आहे. शेती उत्पादनाचा खर्च वाढत चालला असून उत्पन्न कमी होत चालले आहे. शेतकऱ्याला खूप काही दिले असे सांगत आहात; पण नेमके देता किती आणि शेतकऱ्याकडून कराच्या रूपातून घेता किती, याचा पण कधीतरी हिशेब मांडण्याची वेळ आली आहे.

शेतकरी हा अर्थव्यवस्थेला गती देणारा घटक असूनही काही वर्षांपासून शेतकऱ्याच्या हिताचे निर्णय घेतले गेले नाहीत. त्यामुळे देशात मंदी कधी आली तेच समजले नाही. शेतकऱ्यांची खरेदीची क्रयशक्ती कमी झाली आहे. मग बाजारपेठ कुठून चालणार, देशातील व्यापार, उद्योग तरी कसा चालणार, असा सवाल शेट्टी यांनी उपस्थित केला.

बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक नितीन देशपांडे यांनी अर्थसंकल्पातून उत्पन्न व खर्चाचा योग्य समतोल राखण्याची कसरत सरकारला करावी लागते. मागणी व पुरवठ्याचा ताळमेळ घालून अर्थव्यवस्थेला गतिमान करण्याचा प्रयत्न केला जातो, असे सांगितले.

यावेळी चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे यांनी उद्योगांना चालना देण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्याची गरज आहे. उद्योग चालले तरच रोजगार निर्मिती होणार आहे, असे सांगितले. स्मॅकचे सुरेंद्र जैन यांनी प्राथमिक शिक्षण व आरोग्य सुविधेवर भर देण्याची गरज आहे, असे सांगितले.

यावेळी एस. पी. वेल्थचे अनिल पाटील, डॉ. व्ही. एम. हिलगे, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. पी. एस. कांबळे, किरण कर्नाड, यांनी अर्थसंकल्पाच्या अपेक्षा यावर मनोगत व्यक्त केले. आभार डॉ. एम. एस. देशमुख यांनी मानले.

राजू शेट्टी : शिवाजी विद्यापीठात 'अंदाजपत्रक - अपेक्षा व आव्हाने' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन

# शेतीच्या विकासातच मंदीवरील उपाययोजना

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सध्या कृषी क्षेत्रातील गुंतवणूक कमी होत असल्याने देशात मंदीची लाट आली आहे. त्यातून सावरण्यासाठी गावपातळीवरच्या शेतकऱ्याला आर्थिक स्थैर्य देणारे धोरण तयार करून त्याची अंमलबजावणी व्हावी. शेतीच्या विकासातच मंदीवरील उपाययोजना आहेत. त्यामुळे यंदाच्या अर्थसंकल्पाने शेतीचे प्रश्न सोडविण्यासाठी अधिक लक्ष घालावे, असे प्रतिपादन माजी खासदार राजू शेट्टी यांनी मंगळवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभाग, बँक ऑफ इंडिया अध्यासन यांच्यातर्फे आयोजित 'केंद्रीय अंदाजपत्रक - अपेक्षा व आव्हाने' विषयावरील



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी अर्थशास्त्र विभागातर्फे आयोजित चर्चासत्रात माजी खासदार राजू शेट्टी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी संजय शेटे, सुरेंद्र जैन, नितीन देशपांडे, डॉ. जे. एफ. पाटील, विजय ककडे, आदी उपस्थित होते.

चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, तर बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक नितीन देशपांडे, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे, 'स्मॅक'चे सुरेंद्र जैन प्रमुख उपस्थित होते. माजी खासदार शेट्टी म्हणाले, शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला तर त्याची क्रयशक्ती वाढणार आहे. त्यांच्याकडून होणाऱ्या खते, शेती अवजारे, आदींच्या खरेदीमुळे कराच्या माध्यमातून महसूल मिळणार आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेची बळकटीकरण हे शेतकऱ्यांच्या स्थैर्यावरच अवलंबून आहे. ते लक्षात घेऊन शेतकरीवर्गाचा विचार करून अर्थकारणाचा धोरणात्मक आराखडा करणे आवश्यक आहे. डॉ. पी. एस. कांबळे, एम. एस. देशमुख, व्ही. एम. हिलगे, महेश शिंदे, किरण कर्नाड, एस. एस. सूर्यवंशी, श्रीकांत अडीवरेकर यांनी विचार मांडले. प्रा. डॉ. विजय ककडे यांनी प्रास्ताविक केले. अनिल पाटील यांनी आभार मानले.

### शेतकऱ्यांचाच हातभार

शेतकरी सतत सवलती मागणारे असल्याची टीका काही उद्योजक, व्यापाऱ्यांकडून होते. मात्र, शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सवलती, अनुदानासह कराच्या माध्यमातून आर्थिक वसुली होते. त्यामुळे शेतकरी हे खऱ्या अर्थाने अर्थव्यवस्थेला हातभार लावतात, असे माजी खासदार शेट्टी यांनी सांगितले. ते म्हणाले, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढल्यास विविध सवलतींद्वारे सरकारवर पडणारा बोजा कमी होईल. त्यातून सरकारची आर्थिक नियोजनाची कक्षा विस्तारत असून देशाची आर्थिक घडी सुयोग्य होण्यास मदत होईल.

## कोण, काय, म्हणाले?

- नितीन देशपांडे : बँकिंग क्षेत्रातील आर्थिक घडामोडींची कारणे जाणून घेऊन सरकारने धोरणात्मक बदल करावा.
- संजय शेटे : औद्योगिक क्षेत्र सुरळीतपणे चालले, तरच रोजगारनिर्मिती होणार आहे. ते लक्षात घेऊन केंद्र सरकारने उद्योगांसाठी अनुदानाचे पॅकेज जाहीर करावे.
- सुरेंद्र जैन : आगामी अर्थसंकल्पामध्ये आरोग्य, शिक्षण या क्षेत्रांवर सरकारने जास्तीत जास्त लक्ष देण्याची गरज आहे.

## अर्थसंकल्पीय तुटीची मर्यादा पार करावी

प्राप्तीकर दरात २० ते ३० टक्क्यांनी व कंपनी करात आणखी पाच टक्क्यांनी कपात करावी. शेतीसंबंधित पाणी, वीज, वाहतूक क्षेत्रात वाढीव गुंतवणूक करावी. निर्यातवृद्धीसाठी अंशदाने द्यावीत. हे करण्यासाठी गरज भासल्यास सरकारने अर्थसंकल्पीय तुटीची मर्यादा पार करावी. रोजगार निर्मितीचा परिणाम म्हणून मंदी प्रतिबंधित करावी, असे डॉ. जे. एफ. पाटील यांनी सांगितले.

# भारतीय समाजासमोरील व्यक्तिपूजा मोठा धोका

## प्रा. उल्हास बापट यांचे प्रतिपादन



डॉ. बापट

कोल्हापूर : 'भारतीय राज्यघटनेची चौकट भक्कम असल्याने घटनादुरुस्ती केली तरी तिच्या मूळ गाभ्याला धक्का लावणे शक्य होणार नाही. भारतीय व्यवस्थेसमोर भ्रष्टाचार, देशद्रोह व व्यक्तिपूजा हे धोके आहेत. त्यापासून सावध राहिले पाहिजे', असे प्रतिपादन ज्येष्ठ घटनातज्ज्ञ प्रा. डॉ. उल्हास बापट यांनी केले. आजपर्यंतच्या पंतप्रधानांची भारतीय संसदीय राजकीय व्यवस्थेच्या विकासात दिलेल्या योगदानाची तसेच निवडणूक आयोग व न्यायव्यवस्थेच्या भूमिकेची मांडणीही त्यांनी केली.

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभाग आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय राज्यघटना आणि संसदीय प्रक्रिया', या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. रवींद्र भणगे होते.

प्रा.बापट म्हणाले, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ.राजेंद्र प्रसाद, डॉ.पंडित नेहरू यांसारख्या विचारवंतांनी भारतीय राज्यघटना बनविण्यात योगदान दिले आहे. राज्यघटनेचा पाया इतका भक्कम आहे की अनेक वेळा घटना दुरुस्ती होऊनसुद्धा मूलभूत बदल करणे शक्य झाले नसून यापुढेही होणार नाही.'

डॉ. नितीन माळी यांनी प्रास्ताविक केले. वैशाली भोसले यांनी आभार मानले.

## हेरिटेज व्यवस्थापन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज इतिहास मराठा अध्यासनामार्फत हेरिटेज मॅनेजमेंट अँड कॉन्झर्वेशन या अभ्यासक्रमावर कार्यशाळा सुरू झाली आहे. ५ फेब्रुवारीपर्यंत दररोज कार्यशाळा होणार आहे अशी माहिती केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी दिली.

# राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त रॅलीने प्रबोधन

कोल्हापूर : 'लोकशाही वृद्धिंगत होण्यासाठी नवमतदारांनी मतदानात उत्साह ठेवावा,' असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. दहावा राष्ट्रीय मतदार दिवसाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. जिल्हाधिकारी दौलत देसाई अध्यक्षस्थानी होते.

यावेळी रॅली काढण्यात आली. बिंदू चौकात महापौर ॲड सूरमंजिरी लाटकर, जिल्हाधिकारी दौलत देसाई, आयुक्त डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते या रॅलीस प्रारंभ झाला. तत्पूर्वी उपस्थितांनी मतदार दिवसाची प्रतिज्ञा घेतली. राजर्षी शाहू स्मारक भवनातील कार्यक्रमांत कुलगुरू डॉ. शिंदे यांनी मार्गदर्शन केले. आयुक्त डॉ. कलशेट्टी यांचे भाषण झाले. शाहीर डॉ. आझाद नायकवडी यांनी पोवाडा सादर केला. उपजिल्हा निवडणूक अधिकारी सतीश धुमाळ यांनी प्रास्ताविक केले.

# शाहू कॉलेजमध्ये उद्या रोजगार मेळाव्याचे आयोजन

कोल्हापूर, ता. २८ : विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, राजर्षी शाहू कॉलेज, शिवाजी विद्यापीठातर्फे गुरुवारी (ता. ३०) सकाळी दहा वाजता राजर्षी शाहू कॉलेज येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. मेळाव्यासाठी जिल्ह्यातील नामवंत खासगी आस्थापनांनी त्यांच्याकडील विविध स्वरुपाची ७०० तांत्रिक, अतांत्रिक पदे अधिसूचित केली आहेत. इच्छुक उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रभारी सहायक आयुक्त ज. बा. करीम यांनी केले आहे. उमेदवारांनी मेळाव्याच्या ठिकाणी येताना शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे, एम्प्लॉयमेंटचे ऑनलाईन कार्ड, तसेच पात्र पदांसाठी वेबपोर्टलवर ऑनलाईन तीन ठिकाणी नोंद करणे आवश्यक आहे.

# वि. स खांडेकर जयंतीनिमित्त उद्या व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या वतीने वि. स. खांडेकर जयंतीनिमित्त भौतिकशास्त्र सभागृहामध्ये गुरुवार ३० रोजी सकाळी ११. ३० वाजता 'वि. स. खांडेकर यांच्या साहित्याचे पुनर्वाचन' या विषयावर डॉ. एकनाथ पगार हे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के तर डॉ. अनंत लाभसेटवार हे प्रमुख उपस्थित असणार आहेत. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, मराठी विभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे उपस्थित राहणार आहेत.